1 MAR 2017 महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क
शिवाजी विद्यापीठ



उच्च व तंत्रशिक्षण आणि शिवाजी विद्यापीठाच्यावतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम सादर करताना कलाकार.

# सदाबहार लोककलेने मराठीचा गौरव

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

संत ज्ञानेश्वर, संत तुकारामाची अभंगवाणी आणि एकनाथांची भारुडे आणि सदाबहार बैठी लावणी अन् पोवाडा अशा विविध पैलूतून सादर होणारी मराठी संस्कृती आणि भाषा वृद्धींगत करणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाने रसिक प्रेक्षक भक्तिरसात चिंब झाले. ज्ञानेश्वरांच्या अभंगवाणी सादर करताना व्यासपीठावर अवतरलेल्या पालखी सोहळ्याने प्रेक्षकांना दिंडीची अनुभूती दिली.

केशवराव भोसले नाट्यगृहात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी अमुचि मायबोली' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सुमारे अडीच तास झालेल्या कार्यक्रमात अभंग, मराठी गीत, भारुड आणि लावणीतून मराठी भाषेची महती कलाकारांनी अधोरेखित केली.

'या विठूचा गजर हरीनामाचा झेंडा रोवला' या पालखी गीतांने कार्यक्रमाला सुरुवात झाली. अजित परब, सुचित्रा भागवत, धनंजय मस्कर आणि उदेश उमप यांच्या सुरेल गीता दरम्यान पालखी सोहळ्याची अनुभूती रसिक प्रेक्षकांना मिळाली. संत एकनाथांचे भारुड सादर करुन औरंगाबादचे निरंजन भाकरे यांनी मराठी भाषेची प्रतिष्ठा दाखवून दिली.

**शिवाजी विद्यापीठ, 'तंत्रनिकेतन'चा उपक्रम**

उदेश उमप यांनी छत्रपती शिवाजी आणि अफजल खान यांच्या भेटीवरील पोवाडा सादर करुन सभागृहात स्फुल्लिंग फुलवले. होनाजी बाळा यांच्या लावणीला प्रेक्षकांची उत्स्फूर्त दाद मिळाली. त्यानंतर बहिणाबाई, शांता शेळके यांच्या कविता सादर करण्यात आल्या. मंगळागौर, लग्नगीत, भोंडला सादरीकरणातून मराठमोळ्या संस्कृतीचे दर्शन झाले. चिं.वि. जोशी, प्र. के. अत्रे आणि पु. ल. देशपांडे यांच्या विनोदी प्रहसनाने नाट्यगृहात हस्याचे फवारे उडाले. अण्णा भाऊ साठे, नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ यांच्या विद्रोही साहित्यातून वेगळ्या विषयावर पैलू टाकण्यात आला.

मंदार खराडे आणि अभिनेते पुष्कर श्रोत्री यांच्या सदाबहार निवेदनाने कार्यक्रम अधिक संस्मरणीय झाला. उद्घाटन जिल्हा परिषदचे सीईओ डॉ. कुणाल खेमनार यांच्याहस्ते झाले. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शिक्षण सहसंचालक डॉ. अजय साळी, महेश काकडे, अजित चौगले, उमेश तावडे, सुभाष नलवडे आदी उपस्थित होते.

1 = MAR 2017

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लोककलेच्या माध्यमातून मराठीचा जागर

## 'मराठी आमुचि मायबोली' : संत ज्ञानेश्वर, तुकारामाचे अभंग, महाराष्ट्र दर्शनाची पालखी

**कोल्हापूर :** संत परंपरा, भारुड, पोवाडा, लावणी, संगीत नाट्यपदांच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडवित लोककलेच्या माध्यमातून मराठीचा जागर करण्यात आला. निमित्त होते 'मराठी आमुचि मायबोली' कार्यक्रमाचे.

केशवराव भोसले नाट्यगृहात शिवाजी विद्यापीठ, उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'मराठी आमुचि मायबोली' हा कार्यक्रम झाला. उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. कुणाल खेमणार, अभिनेता पुष्कर श्रोती यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी कुलगुरु डॉ. शिंदे म्हणाले, अन्य भाषा जरुर शिकावी; मात्र त्याचसोबत मराठी भाषेचा अभिमान बाळगणे गरजेचे आहे.

डॉ. कुणाल खेमनार म्हणाले, मराठी भाषा वाहत्या नदीप्रमाणे आनंद देणारी आहे. तिचा प्रचार व प्रसार युवा पिढीने केला पाहिजे.

कार्यक्रमाच्या प्रारंभीच महाराष्ट्र दर्शन घडविणाऱ्या पालखी सोहळ्याने झाली. त्यानंतर धनंजय म्हसकर आणि सुचित्रा भागवत, सोनाली कर्णिक यांनी सादर केलेल्या रुणझुण रुणझुण रे भ्रमरा, रंगा येई हो, वृक्षवल्ली आम्हा सोया, खेळ मांडियेला या संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम यांचे अभंगाने सर्वांना तल्लिन केले. पाठोपाठ उदेश उमाप यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांनी अफझल खान वधाचे वर्णन पोवाड्यातून सादर केले. त्यानंतर बहिणाबाई, शांता शेळके यांच्या कविता, मंगळागौर, लग्नगीत, भोंडला, संगीत नाट्यपदांसह विद्रोही साहित्य, मुंबईची लावणी, विनोदी प्रहसन, स्वातंत्र्य संग्रामाचे सादरीकरण केले.

कविता व नाट्यवाचन पुष्कर श्रोती यांनी केले. भारुड निरंजन भाकरे यांनी सादर केले.

कार्यक्रमाचे दिग्दर्शन सुभाष नकाशे, लेखन अजित परब व मंदार खराडे, संगीत संयोजन व गायक अजित परब, नृत्यदिग्दर्शन मीनल भिके, तर निर्मिती सूत्रधार सुनील कुलकर्णी यांनी केले होते. यावेळी विभागीय सहसंचालक डॉ. अजय साळी, शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवेडकर, परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांच्यासह मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते.

आदित्य वेल्हाळ



कोल्हापुरातील केशवराव भोसले नाट्यगृहात सोमवारी सायंकाळी शिवाजी विद्यापीठ, उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'मराठी आमुचि मायबोली' या कार्यक्रमात कलाकारांनी पालखी सोहळ्यातून महाराष्ट्राचे दर्शन घडविले.

11 MAR 2017 महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



उच्च व तंत्रशिक्षण आणि शिवाजी विद्यापीठाच्यावतीने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम सादर करताना कलाकार.

# सदाबहार लोककलेने मराठीचा गौरव

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

संत ज्ञानेश्वर, संत तुकारामाची अभंगवाणी आणि एकनाथांची भारुडे आणि सदाबहार बैठी लावणी अन् पोवाडा अशा विविध पैलूतून सादर होणारी मराठी संस्कृती आणि भाषा वृद्धींगत करणाऱ्या सांस्कृतिक कार्यक्रमाने रसिक प्रेक्षक भक्तिरसात चिंब झाले. ज्ञानेश्वरांच्या अभंगवाणी सादर करताना व्यासपीठावर अवतरलेल्या पालखी सोहळ्याने प्रेक्षकांना दिंडीची अनुभूती दिली.

शिवाजी विद्यापीठ, 'तंत्रनिकेतन'चा उपक्रम

केशवराव भोसले नाट्यगृहात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी अमुचि मायबोली' कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सुमारे अडीच तास झालेल्या कार्यक्रमात अभंग, मराठी गीत, भारुड आणि लावणीतून मराठी भाषेची महती कलाकारांनी अधोरेखित केली.

'या विठूचा गजर हरीनामाचा झेंडा रोवला' या पालखी गीतांने कार्यक्रमाला सुरुवात झाली. अजित परब, सुचित्रा भागवत, धनंजय मस्कर आणि उदेश उमप यांच्या सुरेल गीता दरम्यान पालखी सोहळ्याची अनुभूती रसिक प्रेक्षकांना मिळाली. संत एकनाथांचे भारुड सादर करुन औरंगाबादचे निरंजन भाकरे यांनी मराठी भाषेची प्रतिष्ठा दाखवून दिली.

उदेश उमप यांनी छत्रपती शिवाजी आणि अफजल खान यांच्या भेटीवरील पोवाडा सादर करुन सभागृहात स्फुल्लिंग फुलवले. होनाजी बाळा यांच्या लावणीला प्रेक्षकांची उत्स्फूर्त दाद मिळाली. त्यानंतर बहिणाबाई, शांता शेळके यांच्या कविता सादर करण्यात आल्या. मंगळागौर, लग्नगीत, भोंडला सादरीकरणातून मराठमोळ्या संस्कृतीचे दर्शन झाले. चिं.वि. जोशी, प्र. के. अत्रे आणि पु. ल. देशपांडे यांच्या विनोदी प्रहसनाने नाट्यगृहात हस्याचे फवारे उडाले. अण्णा भाऊ साठे, नारायण सुर्वे, नामदेव ढसाळ यांच्या विद्रोही साहित्यातून वेगळ्या विषयावर पैलू टाकण्यात आला.

मंदार खराडे आणि अभिनेते पुष्कर श्रोत्री यांच्या सदाबहार निवेदनाने कार्यक्रम अधिक संस्मरणीय झाला. उद्घाटन जिल्हा परिषदचे सीईओ डॉ. कुणाल खेमनार यांच्याहस्ते झाले. यावेळी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शिक्षण सहसंचालक डॉ. अजय साळी, महेश काकडे, अजित चौगले, उमेश तावडे, सुभाष नलवडे आदी उपस्थित होते.

11 MAR 201 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागातर्फे आज राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र अधिविभागामार्फत 'सर्वसमावेशक वाढ: भारत कोठे आहे?' या विषयावर बुधवार १ व २ मार्च दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन केले आहे. मानव्यशास्त्र सभागृहात होणाऱ्या या चर्चासत्राचे उद्घाटन बुधवारी सकाळी ११ वाजता कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. तसेच एस. इंद्रकांत हे प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत. या चर्चासत्रात एकूण ६० संशोधक आपले शोध निबंध सादर करणार आहेत. या चर्चासत्रासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. पी. एस. कांबळे व डॉ. विद्या कट्टी यांनी केले आहे.

1 MAR 2011

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## राष्ट्रीय चर्चासत्र

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागातर्फे आज, बुधवारी व उद्या, गुरुवारी राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे. 'सर्वसमावेशक वाढ : भारत कुठे आहे?' असा या चर्चासत्राचा विषय आहे. चर्चासत्राचे उद्घाटन कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते होणार असून एस. इंद्रकांत हे प्रमुख पाहुणे असणार आहेत.

1 MAR 2011

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठात आज अर्थशास्त्रविभागातर्फे राष्ट्रीय चर्चासत्र

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र अधिविभागाच्या वतीने 'सर्वसमावेशक वाढ : भारत कोठे आहे?'(Inclusive Growth: Where India is?) या विषयावर मानव्यशास्त्र सभागृहात दि. १ व २ मार्च रोजी दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. चर्चासत्राचे उद्घाटन कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते होणार असून एस. इंद्रकांत हे प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत. चर्चासत्रात ६० संशोधक शोधनिबंध सादर करणार आहेत. प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी, अर्थशास्त्राचे अभ्यासकांनी चर्चासत्रास उपस्थित रहावे, असे अवाहन अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. पी. एस. कांबळे, चर्चासत्राच्या आयोजक सहायक प्राध्यापिका डॉ. विद्या कट्टी यांनी केले.

F 1 MAR 2011 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आजपासून कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुलाच्या मैदानावर दि. १ मार्च रोजी सकाळी ९ वाजल्यापासून अखिल महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धांना प्रारंभ होत आहे. स्पर्धेचे उद्घाटन छत्रपती संभाजीराजे यांच्या हस्ते व कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

1 MAR 2011 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात आजपासून कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धा

**कोल्हापूरा :** शिवाजी विद्यापीठातर्फे अखिल महाराष्ट्र विद्यापीठ कर्मचारी कुलगुरू चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेस उद्यापासून (ता. १) सुरवात होत आहे. खासदार युवराज संभाजीराजे छत्रपती यांच्या हस्ते सकाळी नऊ वाजता स्पर्धेचे उद्घाटन होईल. क्रीडा अधिविभागाच्या मैदानावर स्पर्धा होत आहे.

पुढारी

1 MAR 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ उन्हाळी सत्र परीक्षा २४ मार्चपासून

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या उन्हाळी सत्र परीक्षांना दि. २४ मार्चपासून सुरुवात होणार आहे. ६२१ अभ्यासक्रमांचे सुमारे ३ लाख विद्यार्थी परीक्षेला सामोरे जाणार आहेत.

शैक्षणिक संस्थांवर अतिरिक्त ताण येऊ नये यादृष्टीने परीक्षा विभागाने सत्र परीक्षांचे वेळापत्रक तयार केले आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील सर्वच महाविद्यालयांमध्ये कला, वाणिज्य, विज्ञान, सामाजिकशास्त्रे, अभियांत्रिकी शाखांच्या परीक्षांना २४ मार्चपासून प्रारंभ होणार आहे. परीक्षेसाठी प्रत्येक जिल्ह्यासाठी दोन भरारी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. संवेदनशील परीक्षा केंद्रावर ज्यादा भरारी पथकाच्या माध्यमातून नजर ठेवली जाणार आहे. यावेळेसच्या सत्र परीक्षांमध्ये वाणिज्य शाखा भाग १, २ व ३ च्या प्रश्नपत्रिकाही 'एसआरपीडी' मोडने पाठविण्यात येणार आहेत. नियमित शुल्क भरण्याची मुदत दि. २८ रोजी संपली आहे. विलंब शुल्कासह दि. १ ते ६ व अतिरिक्त विलंब शुल्कासह दि. ७ ते ११ मार्च या कालावधीत अर्ज भरता येणार आहेत.

परीक्षा विभागाने वेळापत्रक तयार करताना विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये याची दक्षता घेतली आहे. वैद्यकीय, अभियांत्रिकी प्रवेशासाठीची सीईटी, नीट, सेट, नेट व इतर परीक्षांच्या दिवशी विद्यापीठाच्या परीक्षा होणार नसल्याचे परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी सांगितले.